# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८

## समाज विकास विभाग

## जाहीर प्रकटन सन २०२५-२६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत महिला व बालकल्याण योजना, दिव्यांग कल्याणकारी योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना आणि इतर कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. त्यानुसार सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता खालीलप्रमाणे नमुद केलेल्या घटक योजनांच्या अटी व शर्तीनुसार लाभ घेणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील संबंधित घटकातील अर्जदारांनी ऑनलाईन पध्दतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवरील समाज विकास विभाग योजना या सदरामधून **दिनांक २०/१०/२०२५** पर्यंत अर्ज भरणेत यावेत. सर्व घटक योजनांच्या अटी व शर्ती वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. घटक योजना व लाभाचे स्वरुप खालीलप्रमाणे :

## मर्यादित कालावधीकरीता असणा-या योजना

### महिला व बालकल्याण योजना

| अ.क्र. | योजनेचे नाव | लाभाचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | इ.८ वी ते इ.१० वी मधील विद्यार्थीनींना सायकल घेणेसाठी अर्थसहाय्य. | र.रु. ७,०००/- |
| २ | सावित्रीबाई फुले पुरस्कार (सामाजिक संस्था) | र.रु. २५,०००/-, सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह |
| ३ | लोकनायक गोपीनाथ मुंडे १२ - वी नंतरचे (प्रथम वर्ष) वैद्यकीयMBBS, BAMS, BHMS, BDS, BUMS, B.Arch, BPTH, B.Pharm, BVSC आणि अभियांत्रिकी ANM, GNM आणि B.sc Nursing पदवी यांसारखे उच्च शिक्षण घेण्यासाठी अर्थसहाय्य. | र.रु.२५,०००/- |
| ४ | मा. रामभाऊ म्हाळगी - मुलींना तांत्रिक प्रशिक्षण किंवा अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमासाठी अर्थसहाय्य. | आय.टी.आय. र.रु. ३,०००/- अभियांत्रिकी पदविका र.रु ७,५००/- |
| ५ | महाराष्ट्र राज्य मंडळ ( SSC Board) अंतर्गत शाळांमधील इयत्ता १० वी. मधील मुलींना शैक्षणिक साहित्य घेणेकामी अर्थसहाय्य देणे. | र.रु.६,०००/- |
| ६ | नोंदणीकृत बचतगटांना व्यवसायासाठी गाळे उपलब्ध करून देणे. | मोफत गाळे |

### मागासवर्गीय कल्याणकारी योजना

| अ.क्र. | योजनेचे नाव | लाभाचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | माता रमाई आंबेडकर - इयत्ता ५ वी ते १० वी मधील शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वार्षिक शिष्यवृत्ती देणे. **(टिप : या योजनेअंतर्गत मनपाच्या शाळेमध्ये इयत्ता ५ वी ते १० वी मध्ये शिक्षण घेणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरीता पिंपरी चिंचवड मनपा शाळेच्या मुख्यध्यापकांनी सर्व विद्यार्थी तसेच त्यांच्या पालकांना आपले अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरणेबाबत सूचना देण्यात याव्यात)** | शिष्यवृत्ती ही वार्षिक स्वरूपाची असून, इयत्ता ५ वी ते इयत्ता ७ वी मधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना र.रू. ४,०००/- आणि इयत्ता ८ वी ते इयत्ता १० वी मधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना र.रू. ६,०००/- देण्यात येत आहे. |
| २ | महर्षी वाल्मिकी - इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकल घेणेकामी एकदाच अर्थसहाय्य देणे. | सायकल खरेदीकामी एकदाच र.रु ७,०००/- पर्यंत अर्थसहाय्य. |
| ३ | पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर - १२ वी नंतरचे (प्रथम वर्ष) - पदवी अभ्यासक्रम (MBBS, BAMS, BDS, BUMS, BHMS), अभियांत्रिकी पदवी B.Arch, BPTH, B.Pharm, B.Vsc. आभियांत्रिकी ANM, GNM, आणि B.sc Nursing पदवी यांसारखे उच्च शिक्षण घेत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य देणे. | र.रू. २५,०००/- (प्रथम वर्षी) एकदाच |
| ४ | मागासवर्गीय विद्यार्थी / विद्यार्थीनींसाठी विविध संगणक प्रशिक्षण देणे. | प्रत्येक लाभार्थीस उपलब्ध संगणक प्रशिक्षण फी च्या ९०% सवलत. महापालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण |

| | | |
|---|---|---|
| | | संस्थेमार्फत (ITI) MKCL अंतर्गत येणारे, MS-CIT, DTP. Tally व KLIC प्रशिक्षण देण्यात येईल. |

## दिव्यांग कल्याणकारी योजना

| अ.क्र. | योजनेचे नाव | लाभाचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | पंडित दिनदयाल उपाध्याय - दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती ( इ. १ ली ते वय वर्ष १८ पर्यंत ) | वार्षिक र.रु. ३६,०००/- (दरमहा र. रु. ३,०००/-) |
| २ | पंडित दिनदयाल उपाध्याय - ०५ ते १८ वर्षे वयोगटातील दिव्यांगामुळे शाळेत जाऊ न शकणा-या दिव्यांग मुला / मुलींना दरमहा अर्थसहाय्य. | वार्षिक र. रु. ३६,०००/- (दरमहा र. रु. ३,०००/-). |
| ३ | दिव्यांग विद्यार्थ्यांना १२ वी नंतरचे वैद्यकीय (प्रथम वर्ष) (MBBS, BAMS, BHMS, BDS , BUMS) B Arch, BPTH, B.Pharm, BVSC आणि अभियांत्रिकी पदवी परिक्षा यासारखे उच्च शिक्षण घेण्यासाठी अर्थसहाय्य. | फी ची रक्कम परंतू जास्तीत-जास्त र.रु.१,००,०००/- एकदाच (प्रथम वर्षासाठी) |
| ४ | दिव्यांगांना MS-CIT, DTP. Tally संगणक प्रशिक्षण देणे. | महापालिका हद्दीत वास्तव्यास असलेल्या दिव्यांग व्यक्तींना महापालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमार्फत (ITI) MKCL अंतर्गत येणारे, MS-CIT, DTP. Tally व KLIC प्रशिक्षण देण्यात येईल. |
| ५ | पिंपरी-चिंचवड मनपा हद्दीतील मानव हिताच्या दृष्टीकोनातून काम करणा-या, गतिमंद, अंध, कुष्ठरोगी, मुकबधीर, वृद्धाश्रम, अनाथालय अशा संस्थांना अनुदान देणे. | जास्तीत-जास्त र.रु.२,९९,०००/- |

## इतर कल्याणकारी योजना

| अ.क्र. | योजनेचे नाव | लाभाचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | इ. १ ली ते पदव्युत्तर पर्यंत शिक्षण घेणा-या मनपा हददीतील अनाथ / निराधार मुलांना शिष्यवृत्ती देणे. | इ.१ ली ते ९ वी - १०,०००/-<br>इ.१० वी ते १२ वी - १२,०००/-<br>प्रथमवर्ष ते पदवी पर्यंत - १५,०००/-<br>पदव्युत्तर / पदवी - २०,०००/- |
| २ | इ.१०वी मध्ये ८०% ते ९०% गुण संपादन केलेल्या महाराष्ट्र राज्य मंडळ (SSC Board), ICSE BOARD / CBSE BOARD अंतर्गत येणा-या शाळांमधील विद्यार्थी / विद्यार्थीनींना बक्षीस रक्कम देणे. | महाराष्ट्र राज्य मंडळ (SSC BOARD) अंर्तगत येणा-या शाळांमधील विद्यार्थी विद्यार्थिनींना बक्षीस र.रु. १०,०००/-<br>CBSE BOARD / ICSE BOARD अंर्तगत येणा-या शाळांमधील विद्यार्थी विद्यार्थिनींना बक्षीस र.रु. ५,०००/- |
| ३ | इ. १० वी मध्ये ९०% पेक्षा जास्त गुण संपादन केलेल्या महाराष्ट्र राज्य् मंडळ (SSC Board), ICSE BOARD / CBSE BOARD अंतर्गत येणा-या शाळांमधील विद्यार्थी / विद्यार्थीनींना बक्षीस रक्कम देणे. | १. महाराष्ट्र राज्य मंडळ (SSC BOARD) अंर्तगत येणा-या शाळांमधील विद्यार्थी विद्यार्थिनींना बक्षीस र.रु. १५,०००/-<br>२. CBSE BOARD / ICSE BOARD अंर्तगत येणा-या शाळांमधील विद्यार्थी / विद्यार्थिनींना |

| | | |
|---|---|---|
| | | बक्षीस र.रु. ७,५००/- |
| ४ | इ. १२ वी मध्ये ८०% ते ९०% गुण संपादन केलेल्या महाराष्ट्र राज्य मंडळ (HSC Board), CBSE BOARD / ICSE BOARD अंतर्गत येणा-या महाविद्यालयातील विद्यार्थी / विद्यार्थीनींना बक्षीस रक्कम देणे. | १. महाराष्ट्र राज्य मंडळ (HSC BOARD) अंतर्गत येणा-या शाळांमधील विद्यार्थी विद्यार्थिनींना बक्षीस र.रु. १०,०००/-<br>२. CBSE BOARD / ICSE BOARD अंतर्गत येणा-या शाळांमधील विद्यार्थी विद्यार्थिनींना बक्षीस र.रु. ५,०००/- |
| ५ | इ. १२ वी मध्ये ९०% पेक्षा जास्त गुण संपादन केलेल्या महाराष्ट्र राज्य मंडळ (HSC Board), ICSE BOARD / CBSE BOARD अंतर्गत येणा-या महाविद्यालयातील विद्यार्थी / विद्यार्थीनींना बक्षीस रक्कम देणे. | १.महाराष्ट्र राज्य मंडळ (HSC BOARD) अंतर्गत येणा-या शाळांमधील विद्यार्थी विद्यार्थिनींना बक्षीस र.रु. १५,०००/-<br>२. CBSE BOARD / ICSE BOARD अंतर्गत येणा-या शाळांमधील विद्यार्थी विद्यार्थिनींना बक्षीस र.रु. ७,५००/- |
| ६ | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इयत्ता १ ली ते इयत्ता १० वी मध्ये शिकत असणा-या कचरावेचकांच्या मुलांसाठी वार्षिक अर्थसहाय्य देणे. | इ. १ वी ते ७ वी - रक्कम रुपये ४०००/-,<br>इ.८ वी ते १० - वार्षिक रक्कम रुपये ६०००/- |
| ७ | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील इयत्ता १० वी व १२ वी मध्ये ५०% पेक्षा जास्त गुण संपादन करणाऱ्या कचरावेचकांच्या मुलांच्या शिक्षणासाठी वार्षिक बक्षीस रक्कम देणे. | SSC Board - १०,०००/-, १० वी CBSE / ICSE Board - ५,०००/-, HSC Board - १५,०००/-, १२ वी CBSE / ICSE Board- ७,५००/- |
| ८ | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील इयत्ता ८ ते १० मध्ये शिकणा-या कचरावेचकांच्या मुलांना मोफत सायकल देणे. | सायकल खरेदीकामी एकदाच र.रु ७,०००/- पर्यंत अर्थसहाय्य. |

# वर्षभर खुल्या असणा-या योजना

| महिला व बालकल्याण योजना | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **योजनेचे नाव** | **लाभाचे स्वरुप** |
| १ | स्व.प्रमोद महाजन - परदेशातील उच्चशिक्षण / अभ्यासक्रमासाठी निवड झालेल्या युवतीस अर्थसहाय्य | र. रु. १,५०,०००/- (प्रथम वर्षासाठी) |
| २ | मा.अटलबिहारी वाजपेयी - विधवा / घटस्फोटीत महिलांना किरकोळ स्वरुपाचा घरगुती व्यवसाय करण्यासाठी अर्थसहाय्य<br>**(टिप - या योजने अंतर्गत यापुर्वी लाभ घेतलेला असल्यास पुन्हा अर्ज करु नये सदरचे अर्थसहाय्य एकदाच देय राहील.)** | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणा-या कौशल्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेतले असल्यास र.रु.२५,०००/- आणि प्रशिक्षण घेतले नसल्यास र.रु. १५,००० /- |
| ३ | बेटी बचाव बेटी पढाओ - पहिल्या मुलीवर कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया करणा-या महिलेस अर्थसहाय्य. | र.रु.२५,०००/- मुदत ठेव स्वरुपात |
| ४ | मदर तेरेसा - नोंदणीकृत महिला संस्थांना / महापालिकेकडील नोंदणीकृत अनुदान प्राप्त महिला बचतगटांना पाळणाघर सुरु करण्याकरीता अर्थसहाय्य | प्रारंभिक मुलभूत खर्चासाठी र.रु.१०,०००/- त्यानंतर इतर खर्चासाठी दर सहामाहीस र.रु. १२,०००/- |
| ५ | कोरोना प्रादुर्भावाच्या काळात विधवा झालेल्या महिलांना अर्थसहाय्य देणे. | र.रु. २५,०००/- |
| ६ | महर्षी धोंडो केशव कर्वे - विधवा महिलांच्या मुलींना संसार उपयोगी साहित्य घेणेसाठी अर्थसहाय्य | र.रु. २५,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ७ | महर्षी धोंडो केशव कर्वे - विधवा महिलांकरीता पुनर्विवाह प्रोत्साहन योजना | र.रु. २५,०००/- |
| ८ | सहा महिने पुर्ण झालेल्या महिला **बचतगटास** अर्थसहाय्य. | र.रु. १५,०००/- |
| ९ | दोन वर्षे पुर्ण झालेल्या महिला **बचतगटास** अर्थसहाय्य. | र.रु. १५,०००/- |

## मागासवर्गीय कल्याणकारी योजना

| **अ.क्र.** | **योजनेचे नाव** | **लाभाचे स्वरुप** |
|---|---|---|
| १ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर - मागासवर्गीय युवक / युवतींना परदेशातील उच्च शिक्षणासाठी (प्रथम वर्षाकरीता) अर्थसहाय्य देणे. | र.रू.१,५०,०००/- एकदाच (प्रथम वर्षासाठी) |

## दिव्यांग कल्याणकारी योजना

| **अ.क्र.** | **योजनेचे नाव** | **लाभाचे स्वरुप** |
|---|---|---|
| १ | दिव्यांग व्यक्तींना व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणे. | बँकेकडील मंजुर कर्जाच्या ५०% अथवा जास्तीत जास्त र.रु. १,००,०००/- अर्थसहाय्य. |
| २ | विशेष (गतिमंद) व्यक्तींचा सांभाळ करणाऱ्या मनपा हद्दीतील नोंदणीकृत संस्थेस / पालकांस अर्थसहाय्य देणे. | दरमहा र. रु. ३,०००/- |
| ३ | पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील कुष्ठपिडीत व्यक्तींना अर्थसहाय्य | दरमहा र. रु. ३,०००/- |
| ४ | दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या दिव्यांगत्वानुसार उपयुक्त साधन घेणेसाठी अर्थसहाय्य देणे. | लाभार्थींच्या गरजा नुसार, दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार अत्याधुनिक उपकरणे घेणेबाबत अर्थसहाय्य र.रु.१,००,०००/- मर्यादिपर्यंत (एकदाच) |
| ५ | पंडित दिनदयाल उपाध्याय - दिव्यांग कल्याणकारी (अर्थसहाय्य) योजना | र. रु. २,५००/- अर्थसहाय्य प्रति महिना |
| ६ | संत गाडगे महाराज - दिव्यांग व अव्यंग जोडप्यांना विवाहासाठी अर्थसहाय्य देणे. | र.रु. १,००,०००/- ( एकदाच) |
| ७ | दिव्यांग व्यक्तीने दिव्यांग व्यक्तीशी विवाह केल्यास अशा नवविवाहीत जोडप्यास अर्थसहाय्य देणे. | र.रु. २,००,०००/- अर्थसहाय्य |
| ८ | मनपा हद्दीतील दिव्यांगांना मा. प्रधानमंत्री आवास योजना व इतर घरकुल योजनांतर्गत घर खरेदीकामी र. रु. १,००,०००/- अर्थसहाय्य देणे. | र. रु. १, ००,०००/- |
| ९ | दिव्यांग व्यक्तींना फिरत्या वाहनावरील (तीन चाकी ई-वाहन) दुकान उपलब्ध करून देणेकरीता अर्थसहाय्य देणे. | बिलाची रक्कम (जास्तीत जास्त रक्कम रुपये १,७३,२५०/-) एकदाच |

## इतर कल्याणकारी योजना

| अ.क्र. | योजनेचे नाव | लाभाचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड शहरात स्थायिक असलेल्या परिवारातील जवान शहीद झाल्यास त्यांच्या कुटुंबास आर्थिक मदत देणेबाबत. | शहीद जवानाच्या कुटुंबास र.रु. ५,००,०००/- आर्थिक मदत देणे. |
| २ | सामुदायिक विवाह सोहळ्यात सहभागी होणा-या वधूवरा साठी अर्थसहाय्य देणे | र. रु. १५,०००/- अर्थसहाय्य |
| ३ | तृतीयपंथी पेन्शन योजना (वय वर्ष ५० पुढील) | दरमहा र.रु ३,०००/- |
| ४ | महापालिका हद्दीतील तृतीयपंथी व्यक्तींच्या बचत गटांना ६ महिने पूर्ण झाल्यानंतर व्यवस्थापन व बळकटीकरणासाठी अर्थसहाय्य देणे. | र. रु. १५,०००/- |
| ५ | महापालिका हद्दीतील दोन वर्ष पुर्ण झालेल्या तृतीयपंथी व्यक्तींच्या बचत गटांना व्यवस्थापन व बळकटीकरणासाठी अर्थसहाय्य देणे. | र.रु १५,०००/- |
| ६ | वय वर्षे ० ते २१ या वयोगटातील HIV / AIDS बाधीत मुलांचा सांभाळ करणा-या संस्थेस / पालकांस अर्थसहाय्य. | दरमहा र.रु.३,००० /- याप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात येते. |

वरील प्रमाणे नमूद केलेल्या सर्व घटक योजनांचे अर्ज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवरुन मुखपृष्ठावरील महत्वाचे या पर्यायातून समाज विकास विभाग योजना या पर्यायावरुन दिलेल्या मुदतीत भरता येतील. प्रत्येक घटक योजनेच्या नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार आवश्यक ती कागदपत्रे वेबसाईटवर अपलोड करणे आवश्यक आहे. सदरचे ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे अर्ज अर्जदार यांना मोबाईल, लॅपटॉप, संगणकाद्वारे किंवा नागरी सुविधा केंद्रांमार्फत विहीत शुल्क भरून देखिल भरता येतील.

<u>टिप</u> :-

**१) या जाहीर प्रकटनात नमुद केलेल्या सर्व योजना ह्या पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत वास्तव्यास असणा-या नागरीकांसाठीच आहेत.**

**२) अर्जदारांना विनंती करण्यात येते की, Online पध्दतीने बिनचूक व परिपुर्ण अर्ज भरण्यात यावेत. Offline पध्दतीने भरलेले अर्ज नागरी सुविधा केंद्र अथवा क्षेत्रिय कार्यालय अथवा मुख्य इमारत यापैकी कोठेही स्विकारले जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी. Online अर्ज भरताना अर्जदार/लाभार्थी यांनी बँक पासबुकवरील नोंदी नुसार इंग्रजीमध्ये स्वतःचे नाव, आधारकार्ड क्रमांक, बँक खाते क्रमांक खात्रीपुर्वक बिनचूक भरावा. तसेच घटक योजनेत नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसारच सर्व संबंधित कागदपत्रे Upload करावीत.**

**३) अर्जदाराने ज्या क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात वास्तव्यास आहे त्याच क्षेत्रीय कार्यालय (प्रभाग) येथे अर्ज करणे आवश्यक आहे.**

**४) पात्र लाभार्थींचे लाभाची रक्कम अर्जदार यांचे बँक खात्यात जमा होणार असल्याने, अर्ज भरताना बँक पासबुक नुसारच सर्व तपशील अचुक भरणेची दक्षता घ्यावी.**

**५) तसेच बनावट वा दिशाभुल करणारे कागदपत्रे सादर केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.**

- **मर्यादित कालावधी करिता असणा-या योजनांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरणे व स्विकृती दिनांक २१/०७/२०२५ ते दिनांक २०/१०/२०२५ अशी राहील.**
- **विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी क्षेत्रिय कार्यालयामार्फत करून पात्र झालेल्या लाभार्थ्यांना तीन महिने कालावधीत लाभ अदा केला जाईल.**

**जाहिरात क्रमांक :-**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

समाज विकास विभाग

क्र.सविवि/०३/कावि/ ११६ /२०२५

दिनांक :- २१/०७/२०२५

Digital Signature
Signature Valid

Name : JAMBLE PATIL PRADEEP BAPURAO
Designation:Additional Commissioner (1)
Location:.
Date :21-07-2025 14:22